दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA

vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● शुक्रवार २८ जून २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक ३२० ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# पंकजा मुंडे यांच्या राजकीय पुनर्वसनासाठी भाजपचा मेगा प्लॅन, विधान परिषदेसह मंत्रिपदी वर्णी लागण्याची शक्यता

## पंकजा मुंडे यांच्या राजकीय पुनर्वसन मागील गणित काय?

भाजप नेत्या पंकजा मुंडे यांचा लोकसभा निवडणुकीत पराभव झाला. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी पंकजा मुंडे यांचा पराभव केला. या निवडणुकीत बीडमध्ये स्थानिक पातळीवर अनेक गोष्टी बघायला मिळाल्या आहेत. मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनानंतर बीडमध्ये मराठा आणि ओबीसी समाज यांच्यात टोकाचे मतभेद निर्माण झाल्याची चर्चा आहे. राज्यात ओबीसी समाजाच्या नागरिकांची संख्यादेखील मोठी आहे. त्यामुळे ओबीसी समाजाला खूश करण्यासाठी पंकजा मुंडे यांची मंत्रिपदी वर्णी लागू शकते. तसं केल्यास आगामी विधानसभा निवडणुकीत ओबीसी समाजाकडून भाजपला चांगली मते मिळू शकतात.

**बीड/प्रतिनिधी**

भाजपच्या गोटातून सर्वात मोठी आणि महत्त्वाची बातमी समोर येत आहे. भाजप नेत्या पंकजा मुंडे यांच्या राजकीय पुनर्वसनासाठी पक्ष कंबर कसणार असल्याची माहिती मिळत आहे. भाजपकडून पंकजा यांच्या पुनर्वसनासाठी प्लॅन आखण्यात आल्याची माहिती आहे. भाजप पंकजा मुंडे यांना राज्यसभा किंवा विधान परिषदेवर पाठवण्याच्या तयारीत आहे. विशेष म्हणजे पंकजा मुंडे यांना विधान परिषदेवर पाठवल्यास त्यांना राज्यात मंत्रीपद मिळण्याचीदेखील शक्यता आहे. पंकजा मुंडे या भाजपच्या माजी आमदार आहेत. देवेंद्र फडणवीस सरकारमध्ये त्या राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्री होत्या. तसेच त्या बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री होत्या. पंकजा मुंडे यांचे वडील गोपीनाथ मुंडे हे लोकप्रिय नेते होते. त्यांच्या निधननंतर पंकजा या महाराष्ट्राच्या राजकारणात जास्त सक्रिय झाल्या. पंकजा मुंडे यांना मानणारा मोठा वर्ग आहे. ओबीसी समाजाचा त्यांना मोठा पाठिंबा आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत ओबीसी समाजाची मते आपल्याकडे वळवण्यासाठी भाजप पंकजा मुंडे यांचं राजकीय पुनर्वसन करण्याच्या तयारीत आहे, अशी माहिती सूत्रांकडून मिळत आहे. विधान परिषदेच्या 11 जागांसाठी येत्या 13 जुलैला निवडणूक होणार आहे. त्यामुळे पंकजा मुंडे यांना खरंच विधान परिषदेची संधी दिली जाते का? याबाबतच राजकीय वर्तुळात चर्चा सुरु आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पंकजा मुंडे या ओबीसी चेहरा आहेत. त्यामुळे त्यांना विधान परिषदेत संधी दिली जाणार आहे. तसेच आगामी तीन महिन्यांसाठी मंत्रिमंडळ विस्तार झाला तर पंकजा मुंडे यांची मंत्रिपदी देखील वर्णी लागण्याची शक्यता आहे.



## बीड शहाजनपुर बस सेवा कधी धावणार. महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थिनींची गैरसोय. आगार व्यवस्थापकांचे दुर्लक्ष. लवकरात लवकर बस सेवा चालू करा. बाळासाहेब सोलंकर



**बीड/प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील शहाजनपुर (चकला)बस सेवा चालू करण्यात यावी. यासाठी अनेक वेळा निवेदन देऊन सुद्धा याची दखल घेतलेली नाही. या संदर्भात पाठपुरावा केलेला आहे. आगर व्यवस्थापकांनी दखल घेतलेली नाही. आता शाळा ,महाविद्यालय या ठिकाणी जाण्यासाठी अनेक विद्यार्थी विद्यार्थिनी बस पासून वंचित आहेत. या संदर्भात तात्काळ बस सेवा चालू करण्यात यावी अशी मागणी. गेवराई येथील सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब सोलंकर यांनी केली आहे.

## स्वाराती कर्मचारी निवासस्थानांची दुरावस्था ; कर्मचारी भोगत आहेत यातना

**अंबाजोगाई/प्रतिनिधि**

“स्वाराती”ग्रामीण रुग्णालय व महाविद्यालय येथील कर्मचाऱ्यांची राहण्याची सोय म्हणून रुग्णालय परिसरात निवासस्थाने उभारण्यात आले आहे. मात्र येथील निवास्थाने सोयी सुविधांच्या नावाने पूर्णपणे बोंबाबोब आहे. रुग्णालय व निवासस्थान देख भालीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे स्वतंत्र कार्यालय आहे.येथील अभियंता यांना वेळोवेळी भेटून,अर्ज,निवेदन देऊनही समस्या सोडविण्याची मागणी केली. मात्र समस्या आहे तशाच आहेत. त्यामुळे डी वाय एफ आय संघटनेच्या वतीने कार्यकारी अभियंता यांना निवेदन देऊन समस्या सोडवण्याची मागणी केली आहे. जर येत्या १ जुलै पर्यंत मागण्या पूर्ण नाही झाल्यातर कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येणार



असल्याचे निवेदनात म्हंटले आहे.

कर्मचाऱ्यांची निवासाची सोय म्हणून रुग्णालय परिसरात निवासस्थाने उभारण्यात आले आहे. मात्र येथील निवास्थाने सोयी सुविधांच्या नावावर पूर्णपणे बोंबाबोब आहे. या निवासस्थानामध्ये राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना रुग्णसेवेचा कणा म्हणून संबोधल्या जाते. मात्र या निवासस्थानामध्ये राहणे म्हणजे यातना सहन करण्यापेक्षा कमी नसल्याचा अनुभव येतो. याची देखभाल दुरुस्तीची जवाबदारी असणारा सार्वजनिक बांधकाम विभाग मात्र पूर्णपणे निद्रावस्थेत असल्याचे चित्र आहे. या भागामध्ये एन्ट्री करताच सर्वत्र झाडा झुडपांनीच स्वागत होते. झाडे-झुडपांचे साम्राज्य वाढले आहे. दरवाजे खिडक्या मोडकळीस आले आहे. भिंतीवरती मोठमोठी झाडे उगवली आहे. त्यानंतर थोडे आत गेल्यास सर्वत्र अस्वच्छता नजरेस पडते, येथे राहण्यासाठी असणाऱ्या खोल्यांमध्ये प्रवेश केल्यास रंग उडालेल्या भिंती, केवळ नावापुरत्या लागलेल्या खिडक्या दरवाजे, खोल्यांमधील तुटलेले नळ, बंद असलेले शौचालयाचे चेंबर,असेच चित्र खोल्यांमधे पाहायला मिळते. हे निवासस्थान एकप्रकाराचे यातना गृह बनले आहे. कोट्यवधी रुपये खर्चून तयार करण्यात आलेल्या या निवासस्थानांची देखभाल दुरुस्ती अभावी पूर्णपणे वाट लागली आहे.याबाबत येथील अभियंता यांना वेळोवेळी भेटून,अर्ज, निवेदन देऊनही समस्या सोडविण्याची मागणी केली. मात्र समस्या आहे तशाच आहेत. त्यामुळे डी वाय एफ आय या संघटनेच्या वतीने आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. सदरील निवेदनावर डी वाय एफ आय चे जिल्हा उपाध्यक्ष सुभाष चंदनशिव, तालुका अध्यक्ष देविदास जाधव, तालुका सचिव प्रशांत मस्के, संतोष केंद्रे आदींच्या सह्या आहेत.

## निवडणुकीच्या लेख्यांची पोहोच पावती निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांनी घ्यावी

**बीड/प्रतिनिधी** बीड, दि. 27: निवडणूक आयोगाने निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांच्या लेख्यांची तपासणीची कार्यपध्दती विशद केलेली आहे त्यानुसार उमेदवाराने जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांसमोर निवडणूक खचर्चाचे लेखे समावेश असलेली नोंदवही, रोख नोंदवही, दैनंदिन खाते नोंदवही, संक्षिप्त विवरणपत्र (भाग 1 ते 4 आणि अनुसूचित 1 ते 11) सर्व देयके व प्रमाणके (अनुक्रमांक दिलेले) आणि मुळ प्रतीतील शपथपत्र, केवळ खर्चाच्या प्रयोजनासाठी उघडण्यात आलेले बँकेच्या विवरणपत्राची सर्व बाबतीत यथोचीतरित्या भरलेली आणि स्वंय साक्षांकित प्रत् निकाल घोषित झाल्यापासून 30 दिवसाच्या आत सादर करणे बंधनकारक असते. जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयात लेखे दाखल केल्याचा दिनांक व वेळ देऊन लेखे दाखल केल्याचा पुरावा म्हणून पोहोच पावती घ्यावी. जर लेखे विहीत वेळेत आणि आवश्यक रीतीने सादर केले नाहीत तर, आयोगाकडून लोकप्रतिनिधीत्व अधिनियम 1951 च्या कलम 10 क अन्वये अनर्हतेची नोटीस जारी करण्यात येईल, असे 39बीड लोकसभा मतदारसंघ जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी कळविले.




तिरुपती प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा पाचेगाव तालुका गेवराई जिल्हा बीड या ठिकाणी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संस्थेचे अध्यक्ष माननीय शामराव गुरुजी राठोड साहेब यांच्या हस्ते करण्यात आला.

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची पायाभरणी.

**खर्डा ( प्रतिनिधी )**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव, विषय निवडीच्या स्वातंत्र्यसह मातृभाषेत शिक्षण घेऊन प्रेरणा मिळणार आहे. या अनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अभ्यासक्रमात नवीन बदल करण्यात आले आहे.

येथील श्री संत गजानन महाविद्यालय व गुणोत्तर सुधार योजने अंतर्गत चालू शैक्षणिक वर्षांमध्ये नवीन शैक्षणिक धोरणासंदर्भात जागृती करण्याकरता विद्यार्थी व पालकांकरता स्कूल कनेक्ट अभियाना अंतर्गत एकदिवशीय



कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खर्डा येथील श्री संत गजानन महाविद्यालय प्राचार्य डॉ. चंद्रसेन आवारे होते तर व्यासपीठावर महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष. विजयसिंह गोलेकर प्रा. डॉ. माधव शिंदे उपप्राचार्य डॉ. शिवानंद जाधव, डॉ. ओंकार खिस्ते आदी उपस्थित होते. या कार्यशाळेच्या प्रथम सत्रात बोलताना डॉ. माधव शिंदे यांनी नवीन शैक्षणिक धोरणाची संरचना, बहुविद्याशाखीय दृष्टिकोन, त्याचबरोबर विषय निवडीचे स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना स्पष्ट केले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. चंद्रसेन आवारे यांनी नवीन शैक्षणिक धोरणातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळेल, यामध्ये मातृभाषेतून शिक्षण घेऊन संशोधनासाठी प्रेरणा मिळणार आहे. बौद्धिक, सामाजिक, शारीरिक, भावनिक आणि नैतिक या सर्व मानवी क्षमतांचा एकात्मिकपणे विकसित करणे हे सर्वांगीण आणि बहुउद्देशाखीय शिक्षणाचे उद्दिष्ट आहे.

कार्यक्रमाची प्रस्ताविक डॉ. शिवानंद जाधव यांनी केले, सूत्रसंचालन प्रा. राजू मेत्रे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. धनंजय जवळेकर यांनी मानले. यावेळी खर्डा व खर्डा परिसरातील विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजनाबद्दल संस्थेचे सचिव डॉ. महेश गोलेकर यांनी महाविद्यालय गुणवत्ता कक्षाचे कौतुक केले.

बहुविद्याशाखीय दृष्टिकोन हा भावी पिढीसाठी ज्ञानाचा रुंदावणारा असेल या धोरणातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यास नक्कीच मदत होईल. विजयसिंह गोलेकर अध्यक्ष, महाविद्यालय विकास समिती.

## कविता

### बाप

बाप कष्टाचाच धनी ,
राबायचा दिनरात
सुख आणाया घरात
गेली हयात शेतात ।।

दर साल सुगीलाच ,
असं घडायचं काही
कधी रुसायचा मेघ
आणि धरा वांझ होई ।।

हाती कशाचा छदाम ,
नित्य उधार उसणं
पिठा - मिठाला महाग ,
तरी जपलं हसणं ।।

मुलाबाळा पोटभर ,
देता कष्टाची भाकर
रित्या पोटानेच येई ,
त्याला तृप्तीचा ढेकर ।।

हात मातीत राबले ,
सुख कधी ना घावले
चितेवरचे जळणे ,
जितेपणीच भोगले ।।

गत उभा नित्य आधाराला ,
लळा माणसांचा त्याला
गाव भावकीत बाप ,
नाही कोणाला सलला ।।

धरा पिकता अमाप ,
दान देता बलुत्याला
बळीराजाहून मोठा ,
बाप वाटायचा मला ।।

------------------------------------------
-----

सचिन बेंडभर
पिंपळे जगताप, पो- करंदी
ता- शिरूर जि- पुणे 412208.

# जिल्हाधिकारी साहेब इकडे पण लक्ष असू द्या ज्ञानोबारायांच्या जन्मभूमी आपेगावातील पायी पालखीला अपुऱ्या सुविधा

**पैठण/चैताली औटे**

पंढरीच्या वारीची चाहूल लागताच वारकरी, शेतकरी, भाविक ,निर्जला एकादशीपासूनच आवरायला सुरुवात करतो .शेतीच्या कामाचा वेग वाढतो पण जसा पायी वारीत जाण्याचा दिवस येतो तसा दिंडीत सामील होतो. मानाच्या दिंड्यात लाखो वारकरी असतात. त्यांना शासन, प्रशासनाच्या वतीने रस्त्यालगत सर्व सुविधा उपलब्ध होतात. परंतु ज्या घराण्यात पायी वारीची परंपरा गेल्या आठ शतकापूर्वीपासून आज अखंड सुरूच आहे. त्या माऊलींच्या जन्म गावच्या मानाच्या पालखी ला शासन किती सुविधा देतेय हे पाहणंही गरजेचं आहे . दरवर्षी संभाजीनगरचे जिल्हाधिकारी वारीचा आढावा पैठण मध्ये घेतात . यामध्ये संत ज्ञानेश्वर महाराज जन्मभूमी असलेल्या आपेगावहून निघणाऱ्या दिंडी सोहळ्याकडे दुर्लक्ष होताना दिसते .आपेगाव ते पंढरपूर कडे जाणारा मार्ग आजही खडतर आहे. गेल्या कित्येक वर्षापासून गोदावरी नदीतील पालखी पुल कोसळला असल्याने नव्याने या पुलाचे बांधकाम सुरू आहे .परंतु अद्यापही हा पुल तयार झाला नसून आपेगावहून १० कि.मी चा फेरा पार करून जावे लागते.

असे असूनही माऊलींच्या पायी पालखीसोबत किती सुविधा दिल्या जातात याचाही एकदा जिल्हाधिकाऱ्यांनीआढावा घ्यावा. जिल्हाधिकारी साहेबांनी पैठण च्या आढावा बैठकीत सांगितल्याप्रमाणे वारकऱ्यांची सेवा, हीच ईश्वर सेवा समजून काम करा; परंतु आपेगावातूनही वारकरी पंढरीला पायी जातात,तेही ८४७ वर्षापासून मग तहसीलदार, उपविभागीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांनी आजतागायत दखल का घेतली नाही? असा आरोप येथील वारकऱ्यांकडून केला जात आहे.

# अधिवेशन कालावधीत परशुराम आर्थिक विकास महामंडळ कार्यान्वित झाले नाही तर

## आमच्या कडे मत मागायला येऊ नका-धनंजय कुलकर्णी

**केज/प्रतिनिधी**

समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समितीच्या निर्णय समितीची रविवार दि २३ जुन रोजी छत्रपती संभाजी नगर येथे विजयाताई कुलकर्णी यांच्या घरी झाली यामधे सर्वानुमते निर्णय घेण्यात आला की परशुराम आर्थिक विकास महामंडळ या अधिवेशनात कार्यान्वित झाले नाहीतर गृहीत धरणाऱ्या पक्षासह सत्ताधारी पक्षाना ब्राम्हण आपले उपद्रवमुल दाखवतील. छत्रपती संभाजी नगर येथे रविवार दि २३ जुन रोजी समस्त ब्राह्मण समाज समितीची बैठक झाली यामधे धनंजय कुलकर्णी केज , दिपक रणनवरे जालना , श्रीकांत जोशी अकोला , इश्वर दिक्षीत बुलढाणा , विजयाताई कुलकर्णी छत्रपती संभाजी नगर , दिपाली देशपांडे पुणे , अनिल डोईफोडे नांदेड हे निर्णय समिती प्रमुख उपस्थित होते. यावेळी बैठकीत १४ डिसेंबर २०२३ रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांनी परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची घोषणा केली त्यानंतर १ फेब्रुवारी २०२४ रोजी इतिवृत्त तयार झाले परंतु त्यानंतर अद्यापही प्रस्ताव सादर करून परशुराम आर्थिक विकास महामंडळ कार्यान्वित केलेले नाही. परशुराम आर्थिक विकास



महामंडळासाठी विशेष अधिवेशन घेण्याची आवश्यकता नाही , त्यासाठी स्वतंत्र बैठक बोलावण्याची आवश्यकता नाही तरी देखील ब्राह्मण समाज या महाराष्ट्राचा आहे हे सत्ताधारी मानायलाच तयार नाहीत असा अर्थ निघत आहे. विनाकारण सरकार परशुराम आर्थिक विकास महामंडळासाठी टाळाटाळ करत आहेत भारतीय जनता पक्ष ब्राम्हणाला गृहीत धरतो की यांना काही नाही दिले तरी मतदान मिळणारा एकमेव समाज आहे ब्राह्मण त्यामुळे ब्राह्मण समाजाचा विचार करण्याची त्यांना आवश्यकता नाही , भाजप मधील ब्राह्मण नेतृत्व स्वतःची तुंबडी भरून घेण्यात व्यस्त आहेत तर पदाधिकारी पक्षाचे गुलाम म्हणून वागतात आणि बुद्धीभेद करण्यात सराईत आहेत तर शिवसेना हिंदूत्वाच्या मुद्द्यावर ब्राह्मण आपल्याला मतदान करतो अस गृहीत धरतो तर अजीत पवाराची राष्ट्रवादी कॉंग्रेस ला ब्राम्हणाशी काही देणघेण नाही त्यामुळे सरकार ब्राह्मण समाजाचा विचार करण्याच्या मनस्थितीत दिसत नाही. त्यामुळे या अधिवेशन काळात जर परशुराम आर्थिक विकास महामंडळ झाले नाही तर येणाऱ्या निवडणूक मधे ज्या मतदारसंघात ब्राह्मण स्वबळावर निवडून येऊ शकतो तिथे वेगळा विचार करेल , ज्या मतदारसंघात ब्राह्मण मतदान निवडून आणू शकेल किंवा पाडू शकेल अश्या स्थितीत आहे तिथे वेगळा विचार करेल व जिथे कमी आहे तिथे वेगळा विचार करेल याची नोंद सरकारने घेतली पाहिजे जवळजवळ ४५ मतदारसंघ ब्राम्हण बहुल आहेत तर ६० मतदारसंघात गणीत बदलू शकेल अश्या अवस्थेत ब्राह्मण आहे तसेच ब्राह्मण म्हणजे पाय पवित्र अन डोक विचित्र अस संबोधले जाते त्यामुळे सरकारने लवकर विचार करावा व या अधिवेशनात परशुराम आर्थिक विकास महामंडळ १००० कोटी देऊन कार्यान्वित करावे अन्यथा होणाऱ्या परिणामास गृहीत धरणारे असतील याची नोंद आता सगळ्यांनी घ्यावी असे बैठकीत ठरले आहे पुढील रणनितीसाठी निर्णय समिती पुन्हा बैठक घेईल व सरकारला आपले उपद्रवमुल दाखवेल असा विश्वास सर्वानी व्यक्त केला व अधिवेशना नंतर आम्ही तुमच्या कडे येणार नाही आणि तुम्ही पण आमच्या कडे मत मागायला येऊ नका अभियान राबवू असे ठरले आहे.

# गेवराई येथील न्यायालयात नव्याने अंमलात येणाऱ्या कायद्याची जनजागृती शिबिर संपन्न

**गेवराई/प्रतिनिधी**

नव्याने अंमलात येणाऱ्या कायद्याची जनजागृती व्हावी यासाठी येथील न्यायालयात पॅनल प्रमुख , विधीदूत व वकिलांसाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते . २७ जून रोजी दुपारी तालुका विधी सेवा समिती गेवराई व वकील संघ गेवराई यांचे संयुक्त विद्यमाने दिवाणी न्यायालय (क . स्तर ) येथे बालमजुरी विरुद्ध जागतिक दिवस, ड्रग अब्यूज अॅन्ड लिसीट ट्रॅफिकिंग बालकांचे अधिकार



व याविषयी कायदेविषयक जनजागृती शिबीराचे आयोजन करण्यात आले होते .न्या. वानखडे, न्या . कुलकर्णी, न्या . रणदिवे यांनी नव्याने कायद्यात झालेले बदल याबाबत संक्षिप्त मार्गदर्शन केले . या शिबिरास दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर न्या . एस पी वानखडे, न्या . के.एन.मराठे , न्या . एन.ए.रणदिवे, न्या . ए . . कुलकर्णी , वकील संघाचे अध्यक्ष अॅड. अमित मुळे, वकील संघ उपाध्यक्ष अॅड.एस.डी.शिंदे, विधीदूत प्रा . राजेंद्र बरकसे, जानकीराम जोशी, मंगेश कानपाठक , तलवाडा पो. स्टे. एपीआय नरके , गेवराईचे पो. उपनिरीक्षक थोटे, .वकील संघाचे सदस्य, व कर्मचारी उपस्थित होते .

# अंबाजोगाईचे बसस्थानक मराठवाड्यातस्वच्छ सुंदर ; सलग दुसऱ्या वर्षी प्रथम, १० लाखांचे बक्षीस

**अंबाजोगाई/परवेज पटेल**

राज्यातील सगळे बसस्थानक स्वच्छ व सुंदर असावेत, यासाठी राज्य शासनाकडून ‘हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे’ स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान सुरू केले आहे. या अभियाना अंतर्गत सलग दुसऱ्यावेळी अंबाजोगाई बसस्थानक छत्रपती संभाजीनगर विभागात प्रथम आले आहे. यामुळे या बसस्थानकाला १० लक्ष रुपयांचे पारितोषिक मिळणार आहे. ‘हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे’ स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियानासाठी राज्य परिवहन महामंडळामध्ये मध्यवर्ती व विभागीय स्तरावर दोन समित्या स्थापन केल्या आहेत. या अभियानातून स्वच्छता आराखडा तयार केला जातो. तसेच यासाठी १०० गुणांपर्यंत मूल्यांकन करुन गुण दिले जातात. यामध्ये ७६ गुण मिळवत अंबाजोगाई बसस्थानक छत्रपती संभाजीनगर विभागातून प्रथम आले आहे. प्रदेशात अ, ब, क अशाप्रकारे बक्षीसाची वर्गवारी निश्चित करण्यात आली आहे. पहिल्या क्रमांकातील बसस्थानकासाठी १० लाख, द्वितीय साठी ५ तर तृतीय स्थानी राहिलेल्या बसस्थानकासाठी २.५ लाख रुपयांचे बक्षीस देण्यात येते. दरम्यान या मूल्यांकनासाठी विभागस्तरावर विभाग नियंत्रकांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली गेली आहे. यात विभागीय स्थापत्य अभियंता,उपयंत्र अभियंता, विभागीय कामगार अधिकारी व प्रवासी संघटनांचे प्रतिनिधी यांचा समावेश असतो. समितीकडून प्रत्येक दोन महिन्यांच्या अंतरात मध्यवर्ती समितीने ठरवून दिलेल्या विभागाची तपासणी होते. एकूण गुणांच्या ७५ टक्के पेक्षा जास्त



गुण असणाऱ्या बसस्थानकांचा विचार या पुरस्कारासाठी केला जातो.

बस स्थानकातील परिसरातील रस्त्याचे काम करावे - नागरिकांची मागणी

अंबाजोगाई बसस्थानक छत्रपती संभाजीनगर विभागात प्रथम आले आहे. यामुळे या बसस्थानकाला १० लक्ष रुपयांचे पारितोषिक मिळणार आहे.ही अभिनंदनीय बाब आहे परंतु गेल्या चार वर्षांपासून बस स्थानक परिसरातील रस्त्याची खस्ता झाली आहे. प्रवाश्यांबरोबर चालकाला खड्डेमय रस्ते असल्याने आदळ आपट करून बस स्थानकात यावे लागते. खड्ड्याबरोबर धुळीचापण प्रवाश्यांना त्रास सहन करावा लागतो. पावसाळ्यात सर्वत्र चिखल होत आहे. त्यामुळे परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी लक्ष केंद्रित करून तातडीने रस्त्याचे काम पूर्ण करावे अशी मागणी प्रवाश्याकडून होत आहे.

# पुण्यात झिका हातपाय पसरवतोय, आणखी एका रुग्णाला बाधा, पुणेकरांनो काळजी घ्या

**पुणे/प्रतिनिधी**

पुणे शहरातील एक महत्त्वाची बातमी समोर येत आहे. पुण्यात झिका व्हायरसची लागण झालेला आणखी एक रुग्ण आढल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. झिकाचे रुग्ण आढळल्यामुळे पुणे महापालिका ॲक्शन मोडवर आली आहे. पुणे महापालिकेकडून आता सर्व प्रकारची काळजी घेतली जात आहे. तसेच वेगवेगळ्या प्रकारच्या उपाययोजना केल्या जात आहेत. राज्यात पावसाळा सुरु झाला आहे. पाऊस सुरु झाल्यानंतर काही ठिकाणी पाणी साचतं. या पाण्यामुळे विविध डास तिथे येतात.




या डासांमुळे डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनिया सारखे आजार होतात. याशिवाय आता पुण्यात झिका व्हायरसचा सुद्धा शिरकाव झाला आहे. एडिस डास चावल्यामुळे झिका विषाणूचा संसर्ग होतो. पुण्यात या विषाणूने संकर्मित झालेल्या रुग्णांची संख्या 3 झाली आहे. पुण्यात झिकाचा आणखी एक रुग्ण आज आढळला आहे. एरंडवाने भागातच हा रुग्ण आढळला आहे. विशेष म्हणजे याच भागात दोन दिवसांपूर्वी दोन रुग्ण आढळले होते. दोन दिवसांपूर्वी एक डॉक्टर आणि त्याच्या मुलीला झिकाची लागण झाल्याची माहिती समोर आली होती. यानंतर आता आणखी एक झिका व्हायरसचा रुग्ण आढळून आला आहे. त्यामुळ पुणेकरांमध्ये चिंतेचं वातावरण तयार झालं आहे. झिका आजारामुळे फार मोठा गंभीर परिणाम होत नाही. त्यामुळे घाबरुन जाण्याची गरज नाही. पण नागरिकांनी काळजी घेणं जास्त आवश्यक आहे. तसेच योग्यवेळी उपचार करणं देखील जास्त आवश्यत आहे. विशेषत: गर्भवती महिलांनी जास्त काळजी घेणं जरुरीचं आहे कॉलरा आजारही पसरवतोय हातपाय

दरम्यान, देशातील अनेक भागांमध्ये पाऊस पडल्यानंतर आता काही ठिकाणी कॉलरा आजाराने बाधित असलेले रुग्ण आढळले आहेत. विशेष म्हणजे महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये कॉलरा आजाराने बाधित रुग्णांची संख्या आता वाढताना दिसत आहे. कॉलरा हा आजर देखील अतिशय गंभीर आजार आहे. या आजारावर योग्यवेळी उपचार केला नाही तर रुग्णाचा जीवदेखील जाण्याची भीती असते. त्यामुळे नागरिकांनी काळजी घेणं गरजेचं आहे. दूषित पाण्याने जेवण बनवलं असेल तर त्यातून या आजाराची बाधा होऊ शकते. तसेच दूषित पाण्याने निर्माण झालेला भाजीपाला खाल्ल्यानेदेखील या आजाराची लागण होऊ शकते. तसेच दूषित पाणी पिल्यानेदेखील आजाराची लागण होते. त्यामुळे प्रशासनाकडून नागरिकांना पावसाळ्यात विशेष काळजी घेण्याचं आवाहन केलं जात आहे.

## पाटोदा न्यायालयात कायदे विषयक जनजागृती शिबिर सपन्न

**पाटोदा/प्रतिनिधी**

पाटोदा दिवाणी न्यायालय येथे दिनांक २७ जून २०२४ रोजी सकाळी साडेदहा वाजता कायदेविषयक जनजागरण शिबिर आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पाटोदा दिवाणी न्यायालयाच्या न्यायाधीश श्रीमती एस.एन.निकम मॅडम तसेच प्रमुख पाहुणे म्हणून पाटोदा सहदिवाणी ल न्यायाधीश श्रीमती ए.ए.पाटील मॅडम व पाटोदा वकील संघाचे अध्यक्ष विधीज्ञ एस एस कोठेकर हे उपस्थित होते . कायदेविषयक शिबिर प्रसंगी बालकांच्या



मोफत आणि सक्तीचा शिक्षण अधिनियम २००९ याविषयी विधिज्ञ आर.जी. औटे साहेब यांनी तर राईट ऑफ रिजनेबल रेसिडेन्स या विषयावर विधीज्ञ एस.एन. घुमरे यांनी मार्गदर्शन केले तसेच याप्रसंगी लोकअदालत या विषयावर पाटोदा दिवाणी न्यायालयाच्या न्यायाधीश श्रीमती एस.एन.निकम मॅडम यांनी लोकन्यायालय याचे महत्त्व विशद करून लोकन्यायालयात तडजोडीने मिटलेल्या तंटा हा पक्षकारांच्या अपेक्षेप्रमाणे निकाल असतो आणि चर्चेतून अनेक वाद कायमस्वरूपी सहज मीटू शकतात व समाजात शांतता सुव्यवस्था अबाधित राहते यासाठी पक्षकार बंधूंनी लोकन्यायालयात जास्तीत जास्त प्रकरणे सामंजस्याने आपसात तडजोड करून मिटवावीत अशा प्रकारचे आवाहन केले याप्रसंगी पाटोदा न्यायालयाचे विधीज्ञ एस.एम. कोल्हे , विधीज्ञ एन.जी.जाधव विधीज्ञ ए.एम. जगदाळे,विधीज्ञ ऋषिकेश डबीर,विधीज्ञ अविनाश जगदाळे, विधीज्ञ आर. एस.घुले, विधीज्ञ यु.बी. जाधव, विधीज्ञ वैद्य.ए एस,विधीज्ञ एस. आर.नागरगोजे,विधीज्ञ बाळासाहेब जावळे, विधीज्ञ पठाण,विधिज्ञ एस बी जावळे यांनी सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले याप्रसंगी वकील संघाचे सर्व विधीज्ञ न्यायालयीन कर्मचारी व पक्षकार बांधव हे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निसर्ग जपण्यासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा-डॉ. हनुमत सौदागर

**केज/प्रतिनिधी**

युवा ग्राम विकास मंडळ गेल्या २० वर्षापासून बोबाटी नदी विकास व पुनर्जीवन करिता काम करत आहे. आज सर्वज्ञ करियर अकॅडमी केज येथे युवा ग्राम विकास मंडळ व इंडिया वॉटर पार्टनरशीप यांच्या संयुक्त विद्यमाने युथ लीडरशिप ट्रेनिंग प्रोग्राम घेण्यात आला. या



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सर्वज्ञ करियर अकॅडमी चे संचालक प्रा. दत्ता बांगर, प्रमुख मार्गदर्शक डॉ. हनुमंत सौदागर हे होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस संतोष रेपे यांनी कार्यक्रमाची रूपरेषा समजावत जमलेल्या युवकांना पाठीमागील 2 वर्षापासून करत असलेल्या कामाबाबत उजळणी केली व पुढे आपण काय करणार आहोत याबाबत नियोजन सांगितले. प्रमुख मार्गदर्शक डॉ. हनुमंत सौदागर यांनी आपल्या मार्गदर्शनातून जमलेल्या युवकांना नैसर्गिक साधन संपत्तीच्या होत असलेल्या ऱ्हासाबद्दल चर्चा केली. आपणच आपल्या पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास कसे रोखू शकतो व त्यावर काय उपाययोजना करायला हव्यात गावात बोबाटी नदी मधून वाहत जात असलेले पाणी कसे आढवले पाहिजे, शासकीय योजना व इतर योजनांचा अंमलबजावणी करत असताना आपण त्यात कोणती भूमिका घेतली पाहिजे, गावातील तरुण एकत्र येऊन आपण पिण्याचा पाण्यावर व शेतीच्या पाण्यावर काय काय उपाय योजना करू शकतो यावर डॉ. हनुमंत सौदागर यांनी जमलेल्या युवकांना मार्गदर्शन केले. पाण्याविषय जागरूक असणाऱ्या तरुण शेतकऱ्यांनी या बोबाटी नदीवरील बंधारे दुरुस्ती व पिण्याच्या पाण्याबद्दल सद्य स्थितीची माहिती दिली. शेतीच्या व पिण्याच्या पाण्याच्या जल स्त्रोतांचे बळकटीकरण करण्याकरिता युवकांचा सहभाग किती महत्वाचा आहे. व उद्याच्या शेतीवरील पाणी व्यवस्थापन हे युवकच करू शकतात. याबाबत युवा ग्राम विकास मंडळ युवकांना विविध प्रशिक्षणे देत आहे. युवा ग्राम विकास मंडळ नदी काठच्या 10 गावातून 30 युवकांचा गट तयार करून त्यांना जल स्त्रोतांचे पुर्नजीवन करण्यासाठी तज्ञ व्यक्तीकडून प्रशिक्षण देणार आहे. तसेच या युवकांची सहल देखील घेऊन जाणार आहे. अशी माहिती युवा ग्रामचे संतोष रेपे यांनी दिली. प्रा . दत्ता बांगर सर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून जमलेल्या युवकांना नैसर्गिक संसाधन जोपासणे व ते टिकवून ठेवणे याबाबत मार्गदर्शन केले. शेवटी युवकांना प्रश्न उत्तरे विचारन्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश काळे यांनी केले तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संतोष रेपे संभाजी, व इतर यांनी प्रयत्न केले.

## वंजारी महासंघ युवक आघाडीच्या राज्य सरचिटणीसपदी राजेश भाऊ नागरे यांची निवड

### सामजिक कार्यातील राजेशजी नागरे यांची कार्य पाहून त्यांची निवड-गणेशजी खाडे
### राज्यातील विविध भागातील निवडी लवकरच घोषित करणार : नितीन ढाकणे

**बीड/प्रतिनिधी**

वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्याच्या वतीने युवक आघाडीच्या निवडी करण्यात येत आहेत, राष्ट्र निर्माणात योगदान ही कर्तव्य आणि जबाबदारी असून नैतिक मूल्य रक्षणासोबतच संस्कृती व संस्कारक्षम पिढीच्या निर्माणसाठी एक पाऊल सामाजिक सांस्कृतिक संस्कृती टिकवण्यासाठी



आपण आजवर केलेल्या अनमोल कार्याची दखल घेऊनच, वंजारी महासंघात निवडी केल्या जातात, त्याच माध्यमातून वंजारी महासंघ युवक आघाडीच्या राज्य सरचिटणीसपदी नाशिक येथील राजेश भाऊ नागरे यांची निवड करण्यात येत असून आपण सुसंस्कृत समाज व संस्कार पिढी घडविण्यासाठी नक्कीच योगदान द्याल आपण यापुढेही सामाजिक क्षेत्रात नवनवीन बदलांसह भावी पिढीला नवी दिशा देण्यासाठी पूर्ण क्षमतेने कार्य कराल असा विश्वास व्यक्त करून वंजारी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष गणेशजी खाडे (विचारवंत,साहित्यिक, लेखक, अध्यात्मिक मार्गदर्शक, तथा संस्थापक अध्यक्ष वंजारी महासंघ) व माननीय खंडेराव मुंडे राज्य संपर्कप्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली, वंजारी महासंघ महाराष्ट्र, युवक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष नितीन ढाकणे यांनी, वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्य युवक आघाडीची निवड जाहीर केली आहे आणि लवकरच राज्यातील विविध निवडी जाहीर करणार असल्याचे नितीन ढाकणे यांनी सांगितले.

## पैठण-पंढरपुर पालखी मार्गावरील शहरातील रस्त्याची तात्पुरती दुरुस्ती करा-मुकुंद शिंदे

**पाटोदा/प्रतिनिधी**

पाटोदा शहरात आषाढी यात्रेनिमित्त दोन पालख्या येत असल्याने पैठण पंढरपूर रोड ची तात्पुरती दुरूस्ती करावी अशी मागणी एका निवेदनाद्वारे पाटोदा नगरपंचायत चे मुख्याधिकारी यांच्या कडे शिवसेना तालुकाप्रमुख मुकुंद शिंदे यांनी केली आहे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की सध्या आषाढी यांत्रेनिमित्त पाटोदा शहरामध्ये दोन पालख्याचा मुक्काम व एक पालखी शहरामधुन प्रतिवर्षी जात असते. तसेच पुर्ण पंधरवाडयात शेकडो दिंडया पाटोदा शहरामधुन जातात. पाटोदा शहरातील पैठण पंढरपूर रस्ता के.टी. सानप यांचा दवाखाना ते रंधवे महाराज यांचे मठापर्यत रस्त्याची अत्यंत वाईट अवस्था झालेली आहे. तसेच या मार्गावर घाण पाणी साचल्यामुळे मोठमोठे खड्डे पडलेले आहेत. तसेच रस्त्याच्या कडेला दोन्ही बाजुने घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. तसेच पाटोदा शहरामध्ये सर्वत्र घाणीचे साम्राज्य आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे व पालखी आणि दिंडयाच्या आगमणामुळे आरोग्याच्या दृष्टीने पाटोदा शहरामध्ये स्वच्छतेची आवश्यकता आहे. व ते नगरपंचायतचे अद्यकर्तव्य आहे. पैठण पंढरपुर मार्गाचे वारंवार निवेदन दिलेले आहे. तसेच हे प्रकरण न्यायप्रलंबीत आहे. परंतु त्याची संबधित गुत्तेदार दुरुस्ती करत नाही. सध्या दिंडया आणि पालखीचे आगमणामुळे त्या रस्त्याची तात्पुरती तात्काळ दुरुस्ती करणे हे नगरपंचायतचे कर्तव्य आहे आणि तसेच शहरातील सर्व पोलवरील लाईटची व्यवस्था तात्काळ करण्याची गरज आहे. अन्यथा शिवसेना आंदोलन करणार असा इशारा निवेदनात करण्यात आला आहे

## युवा उद्योजक रामेश्वर ऊर्फ (सोनु) बच्चेवार यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय विद्यार्थ्यांना खाऊ वाटप

**लोहा/प्रतिनिधी** लोहा येथील प्रसिद्ध लक्ष्मीराज सुपर मार्केटचे मालक रामेश्वर ऊर्फ (सोनु) बच्चेवार यांच्या वाढदिवसानिमित्त शिव छत्रपती प्राथमिक व



माध्यमिक विद्यालय लोहा येथे शालेय विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. शिव छत्रपती माध्यमिक विद्यालयाचे विद्यालयाचे मुख्याध्यापक डी. ई वडजे सर यांनी त्यांना पुष्पहार हार घालून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या व यावेळी उपस्थित शिव छत्रपती प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक पवार सर, राहुल पारेकर सर , हरिहर धुतमल सर, रमेश पिठ्ठलवाड सर, गुद्दे सर, कहाळेकर सर, शेख सर, शेटे सर,कळकेकर मॅडम , जामगे सर , एस. ई. पवार सर , व्यंकट पवार सर , शेंडगे मॅडम , खरात मॅडम व आढाव मॅडम आदींची उपस्थिती होती.

# शेतपिकाच्या नुकसानीची रक्कम मिळण्यासाठी शेतक-यांनी ई- केवायसी करण्याचे आवाहन

**बीड/प्रतिनिधी**

बीड, दि. 27: माहे सप्टेंबर, ऑक्टोबर 2022 मध्ये अतिवृष्टी तसेच सततच्या पावसामुळे झालेले शेतपिकांचे नुकसान आणि माहे मार्च, एप्रिल 2023 मध्ये अवकाळी पावसामुळे व दुष्काळ 2023 मध्ये झालेले शेतीपिकांचे नुकसानापोटी बीड जिल्ह्यातील 964804 बाधित शेतकरी लाभार्थ्यांना रुपये 717.09 कोटी अनुदान मंजूर झाले असून सदर अनुदानाचे संगणकीय प्रणाली मार्फत शेतकऱ्यांच्या बँक खात्यात निधी वितरण सुरू आहे.

त्यानुसार जिल्ह्यातील 682812 शेतकरी लाभार्थ्यांच्या बँक खात्यात रुपये 568.52 कोटी अनुदानाचे वितरण झाले असून उर्वरित 281992 शेतकरी लाभार्थ्यांपैकी 101196 लाभार्थ्यांच्या माहिती सबंधी दुरुस्ती करण्यासाठी संबंधित शेतकऱ्यांनी (आधार सेंटरवर जाऊन) BActive करून घेणे व बँक खात्यास आधार मॅपिंग करण्यात यावे.

सद्यस्थितीमध्ये 180796 लाभार्थ्यांपैकी 72410 लाभार्थ्यांनी ग्राम स्तरावर प्रसिद्ध झालेल्या विशिष्ट क्रमांक यादी लिस्ट मधील अनुक्रमांकनुसार आपले सरकार सेवा केंद्र, नागरी सुविधा केंद्र येथे आधार प्रणानीकरण (ई- केवायसी) करणे आवश्यक आहे. याची तालुका निहाय आकडेवारी खालील प्रमाणे आहे. खालील प्रमाणे शेतकरी यांनी (Vk नंबर) नुसार आपले सरकार सेवा केंद्र, नागरी सुविधा केंद्र येथे आधार प्रमाणीकरण (ई केवायसी) तात्काळ करून घेण्यात यावी.

अंबाजोगाई-11673,बीड-11000,आष्टी-7166,धारुर-7018,माजलगाव-6926,केज-6833,पाटोदा- 5634,शिरुर कासार-4719,वडवणी-4485 गेवराई-4277 आणि परळी 2679 एकूण 72410 तसेच अंबाजोगाई, वडवणी व धारुर या तालुक्यात खरीप 2023 मध्ये दुष्काळ घोषित झाला असून या तालुक्यात 11089 शेतकरी लाभार्थ्यांनी आपली माहिती (आधार कार्ड व बॅक पासबुकची प्रत) संबंधित गावचे ग्रामसेवक, तलाठी यांच्याकडे जमा करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी बीड यांनी केले आहे.

## निवडणूक खर्चचा ताळमेळसाठी पुनर्मेळ बैठकीचे आयोजन दि. ३० जुनला

**बीड/प्रतिनिधी**

बीड, दि.27: निवडणूक खर्च संनियंत्रणाच्या अनुदेशाप्रमाणे निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांच्या लेख्यांची तपासणीची कार्यपध्दती विशद केलेली आहे. त्याप्रमाणे सारसंग्रह जोडपत्र सी-10 व सी-12 नुसार निकालाची घोषणा केल्याच्या नंतर 26 व्या दिवशी जिल्हा निवडणूक अधिकारी यांचेकडून आयोजीत करण्यात आलेल्या लेखा पुनर्मळ बैठकीमध्ये उमेदवारास निवडणूक खर्चासाठी नमूद केलेल्या रक्कमेचा कोणतीही तफावत असल्यास पुनर्मळ घालण्याची दुसरी संधी देण्यात येते. त्यामुळे उमेदवार त्यांचे निवडणूक प्रतिनिधी त्यांच्या निवडणूक खर्चाच्या खात्यामध्ये निवडणूक खर्चाच्या बाबी संदर्भात काही विवाद असेल तर निवडणूकीच्या कालावधीमध्ये गोळा केलेल्या पुराव्यासह मेळ घालू शकतात. निवडणूक निर्णय अधिकारी तशी नोटीस निर्गमीत करतात. अशी तरतूद आहे.

## स्थानिक न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध गवते पितापुत्र अपिलात , न्यालयाकडून जामीनमारहाण प्रकरणात स्थानिक न्यायालयाने दिली होती दीड वर्षाची शिक्षा

**बीड/प्रतिनिधी**

बीड दि. २७ (प्रतिनिधी ) : पंचायत समिती सभापती निवडणुकीच्या वादातून झालेल्या भांडणात बेलूर येथील पांडुरंग गवते आणि इतरांना मारहाण केली म्हणून बीडच्या स्थानिक न्यायालयाने बबन गवते आणि बळीराम गवते यांना दीड वर्षाची शिक्षा सुनावली होती, या प्रकरणात गवते पितापुत्रांनी सत्र न्यायालयात धाव घेतली आहे. सत्र न्यायालयाने या प्रकरणातील गवते पितापुत्रांचे अपील दाखल करून घेतले असून दोघांनाही जामीन दिला आहे. बीड पंचायत समिती सभापतींच्या निवडणुकीदरम्यान बेलूर ता. बीड येथील पांडुरंग गवते आणि बबन गवते या दोन गटात हाणामारी झाली होती. या प्रकरणात पांडुरंग गवते यांच्या फिर्यादीवरून बबन गवते, बळीराम गवते व इतरांविरुद्ध गुन्हे दाखल झाले होते. या प्रकरणाचा तपास बीड ग्रामीण पोलिसांनी करून बीडच्या न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. या प्रकरणात बीडच्या प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाने गुरुवारी गवते पितापुत्रांना दीड वर्षाची कैद आणि दंड अशी शिक्षा सुनावली होती. गवते पितापुत्रांनी तात्काळ या षीकेशेंला आव्हान देणारे अपील बीडच्या सत्र न्यायालयात दाखल केले. यात न्यायालयाने बबन गवते, बळीराम गवते आणि इतरांना जामीन मंजूर केला आहे. आपला न्यायव्यवस्थेवर विश्वास असून अपिलात आपल्याला नक्की न्याय मिळेल असे बबन गवते यांनी म्हटले आहे.

## माजी सैनिक प्रकाश वाघमारे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रम घेऊन साजरा वृक्षारोपण व किरणा साहित्याची वाटप

**बीड/प्रतिनिधी**

चाळीस वर्ष भारतीय सैन्यात सेवा बजावल्यानंतर माजी सैनिक प्रकाश वाघमारे निवृत्तीच्या नंतरही आपला समाजसेवेचा वसा कायम ठेवला आहे. समाज हिताचे प्रश्न घेऊन वेळोवेळी आंदोलने, धरणे उपोषणे केली आहे. समाज हिताच्या चळवळीत साठी योगदान देत आहेत.त्यांनी देश सेवेनंतर समाजसेवेचे वृत्त हातीती घेतले आहे. समाजाप्रती आपण काही तरी चांगलं करायचं आहे ही भावना कायम. माजी सैनिका प्रकाश वाघमारे यांनी त्यांचा वाढदिवस आगळ्यावेगळ्या प्रकारे साजरा केला .



वासनवाडी परिसरात असलेल्या रामगड येथील आदिवासी समीकरणे येथील अनाथ बालकासमवेत आपला वाढदिवस साजरा केला.अनाथ, निराधार, वंचित उपेक्षित मुला मुलींसाठी एक महिना पुरेल एवढे किराणा सामान त्यांनी यावेळी भेट दिली.सहकुटुंब सहभागी होऊन परिसरामध्ये वृक्षारोपणही केले. एक आगळावेगळा उपक्रम राबवला. यावेळी त्यांनी असे सांगितले की महापुरुषांचे अनुकरण करून मुलांनीही मोठे बनाव व जिल्ह्याचं व आदिवासी समीकरण गुरुकुल च नाव मोठं करावं तसेच यावेळी त्यांनी पालकांना व संचालकांना असेही ग्वाही दिली की वेळोवेळी जर कसल्याही प्रकारे मदत लागली तर मी मदत करणार आणि येणाऱ्या काळामध्ये अशाच पद्धतीने सामाजिक उपक्रम राबवत राहणार आहेत. सत्कारास उत्तर देताना माजी सैनिक प्रकाश वाघमारे यांनी म्हटले यावेळी त्यांच्यासमवेत त्यांचे कुटुंबातील सर्वसदस्य, संपादक बालाजी जगतकर संपादक गणेश शिंदे व आदिवासी समीकरणाचे सुधीर भोसले,त्यांचे सर्व सहकारी मुलं, मुली मोठ्या संख्येने उपस्थित होते.



बीड येथे झालेल्या प्रोअक्टि अबकॅस इंटरनॅशनल समर कांम्पिटेशन २०२४ स्पर्धेत अंधारे वनिता मॅडम व दिलिप अंधारे सर यांच्या क्लासचा विद्यार्थी यांनी उत्कृष्ट परफॉर्मन्स केल्याबद्दल बचपन बालविद्या मंदिरच्या संचालक सौ.वैशाली कराड मॅडम यांनी चि.आहिल नदिम काझी या विद्यार्थ्यांच कौतुक करुन सत्कार केला.

# शिकेल तोच, टिकेल : नितीनचंद्र कोटेचा

## वर्धमान स्थानकवासी श्वेतांबर जैन श्रावक संघ आणि जैन दिवाकर शिक्षणमंडळाच्या वतीने समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

### धर्मादाय आयुक्तांच्या आदेशाने निवड झालेल्या नुतन श्रावक संघाच्या कार्यकारणीचा सन्मान

साधारणत: चार वर्षांपासून प्रलंबित असलेल्या वर्धमान स्थानकवासी श्वेतांबर जैन श्रावक संघ बीडच्या कार्यकारणीच्या निवडीसाठी धर्मादाय आयुक्तांनी दिलेला निर्णय आणि अधिकारानुसार ट्रस्टी ॲड. रतीलालजी भंडारी व भगवानदासजी लोढा यांनी नवीन कार्यकारणीची निवड केली. कार्यकारणीच्या अध्यक्षपदी श्री. सुभाषचंद चंदुलालजी दौडिया, उपाध्यक्षपदी रामलाल खुशालचंदजी छाजेड, सचिवपदी मनोज कांतीलालजी कोटेचा, सहसचिव स्वप्निल अभयचंदजी कोटेचा, कोषाध्यक्षपदी मनोज कमलचंदजी सोनी तसेच विश्वस्त म्हणून ॲड. रतीलाल भंडारी, पारस बोरा, पारसमल बागमार, सुभाष कोटेचा, दिलीप खिवंसरा, दीपककुमार सुराणा, आनंद मुगदिया, वर्धमान खिवंसरा, राजीव बागमार, पंकज बोरा यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी नुतन कार्यकारणीच्या पदाधिकाऱ्यांचा देखील जैन दिवाकर शिक्षण प्रसारक मंडळ आणि समजातील मान्यवरांच्या हस्ते यथोचित सत्कार करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.



**बीड । प्रतिनिधी**

जैन दिवाकर शिक्षण प्रसारक मंडळ आणि वर्धमान स्थानकवासी श्वेतांबर जैन श्रावक संघ बीडच्या संयुक्त विद्यमानाने इयत्ता दहावी-बारावीसह व्यवसायीक अभ्यासक्रमांमध्ये घवघवीत यश संपादन करणाऱ्या जैन समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा येथील जैन भवनमध्ये बुधवारी (दि.26) समाजातील मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी समाजभुषण नितीनचंद्रजी कोटेचा म्हणाले की, सध्याचा काळ हा स्पर्धेचा असून मुलांनी विद्यार्थी दशेपासून शिक्षकांनी दिलेल्या शिकवणीवर लक्षकेंद्रीत केले पाहिजे. कारण जो शिकेल तोच टिकेल हीच आजची परस्थिती आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अवांत्तर बाबींकडे लक्ष न देता आपले उज्वल भविष्य घडविण्यासाठी एकाग्रतेने अभ्यासावर भर दिल्यास यशाचे शिखर गाठता येणे शक्य आहे असा मोलाचा सल्ला ही श्री. कोटेचा यांनी विद्यार्थ्यांना दिला. जैन समजातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत करण्यासाठी दरवर्षी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करुन योग्यदिशा देण्यासाठी जैन दिवाकर शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने मार्गदर्शन केले जाते. यंदाही इयत्ता दहावी आणि बारावी परिक्षेमध्ये यश संपादन करणाऱ्या तसेच नीट परिक्षेद्वारे वैद्यकीय अभ्यासक्रमासह इंजिनिअरिंगच्या अभ्यासक्रमासाठी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांची निवड झालेल्या त्या गुणवंत विद्यार्थ्यांचा जैन दिवाकर शिक्षण प्रसारक मंडळ आणि वर्धमान स्थानकवासी श्वेतांबर जैन श्रावक संघ बीडच्या संयुक्त विद्यमानाने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाजभूषण नितीनचंद्रजी कोटेचा होते. यावेळी जैन समाजातील जेष्ठ भगवानदासजी लोढा, विजयराजजी खिवंसरा, प्रकाशचंदजी कोटेचा, शरदजी लोढा, मनोजजी छाजेड याची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी सीए आदेशजी नहार, जितेंद्रजी बोरा, डॉ. धिरजजी नहार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच पृथ्वीराज आब्बड यांनी मन की बात मधुन सामाजिक सद्य परस्थिती बाबत समाजासमोर आपले विचार मांडले तर गुणवंत विद्यार्थ्यांना रामलालजी छाजेड, अभयचंदजी कोटेचा यांनी शुभेच्छा दिल्या व समाजातील अन्य विद्यार्थ्यांनी देखील विविध क्षेत्रामध्ये स्वत:सह समाजाचे नाव लौकीक करण्याची जवाबदारी आजच्या विद्यार्थ्यांवर असल्याचेही उपरोकत मान्यवरांनी म्हटले. प्रस्ताविक सुशिल आब्बड यांनी तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वप्निल कोटेचा, सौ. सारिकाजी नहार यांनी केले. आभार राहुलजी बोरा यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थ्यांसह जैन समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पारस बोरा, सुशिल सुराणा, सुनिल दोडिया, सुशिल आब्बड, राहुल बोरा,जितेंद्र लोढा, पृथ्वीराज आब्बड, रामलाल छाजेड सर, मनोज कोटेचा आदींनी परिश्रम घेतले.

दैनिक वादळ वार्तांहे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनूडिजिटल छापन संप् ादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 के ज येथन तू यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित के ले आहे ( वाद के ज / बीड न्यायालय अंतर्गत )